क्र.मनपा/नसवि/२/विस/ २ /२०१२-२०१३
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका
दिनांक :- ११ ऑक्टोंबर, २०१२

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०२ /२०१२-२०१३

महानगरपालिका विशेष सभेची नोटीस

प्रति,
मा. _____
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **सोमवार दि.१५/१०/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता** पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१(५) मधील तरतुदीनुसार स्थायी समिती सभापती निवड करणे.

मा.महापौर, यांचे आदेशाने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विशेष महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १५/१०/२०१२

ठराव क्रमांक :- १२५

विषय क्रमांक :- ०१

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१(५) मधील तरतुदीनुसार स्थायी समिती सभापती निवड करणेकामी मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांचेकडे श्री.संजय नायकू मेंढे यांची स्थायी समिती सभापती पदासाठी पहिली सूचना व श्री.राजू लक्ष्मण गवळी यांची स्थायी समिती सभापती पदासाठी दुसरी सूचना प्राप्त झाली.

प्राप्त सूचना पिठासीन अधिकारी तथा महापौर यांनी सभागृहामध्ये वाचून दाखविल्या व सदरच्या सूचनावर सभागृहामध्ये हात वर करुन मतदान घेण्यात आले. त्यामध्ये श्री.संजय नायकू मेंढे यांची सभापती स्थायी समिती या पदावर निवडकरणेसाठी आलेल्या सुचनेच्या बाजूने ३९ मते मिळाली व श्री.राजू लक्ष्मण गवळी यांची सभापती स्थायी समिती या पदावर निवड करणेसाठी आलेल्या सुचनेच्या बाजूने २८ मते मिळाली असून श्री.संजय नायकू मेंढे यांची सभापती स्थायी समिती पदावर निवडकरणेसाठी आलेल्या सूचनेच्या बाजूने सर्वात जास्त ३९ मते मिळाली असलेने श्री. संजय नायकू मेंढे यांची स्थायी समिती सभापती पदी बहुमताने निवड करणेत आली तसे पिठासीन अधिकारी यांनी घोषीत केले.

सूचक

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :-

महापौर,